# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१
तार-Edutech E-mail:- desk5@dte.org.in Web :- http://www.dte.org.in

अत्यंत तातडीचे
कालमर्यादा दि २६.१०.२०१५

क्रमांक : ५(३)/पदांचा आढावा/२०१५/ ६२५१
दिनांक : 12 OCT 2015

प्रति,

१. सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

**विषय : तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील स्वायत्त तसेच शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी / पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांतील शिक्षकीय तथा शिक्षकेत्तर पदांचा फेर आढावा.**

तंत्र शिक्षण संचालनालयाचा तसेच अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय पदवी / पदविका व तत्सम संस्थेतील शिक्षकीय व प्रशासकीय पदाचा आढावा शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनस्तरावर शिक्षकीय पदांच्या आढाव्याबाबतची कार्यवाही सुरु असून शासनाने संस्थानिहाय मंजूर भरलेल्या रिक्त पदांची सुधारीत माहिती सादर करण्यास सुचित केले आहे. यंथे असे नमुद करण्यात येते की, शासकीय पदवी तथा पदविका संस्थांतील रिक्त शिक्षकीय पदांवर कंत्राटी / हंगामी उमेदवार कार्यरत होते अशा उमेदवारांच्या नियमीत नियुक्तीबाबत शासन आदेश निर्गमीत झाले आहेत तसेच त्यांच्या पदस्थापनेचे शासन आदेशही निर्गमीत झाले आहेत. पदस्थापनेच्या शासन निर्णयास अनुसरुन शिक्षकीय पदे भरण्याबाबतची कार्यवाही झाली असल्याने संस्थेच्या पदांच्या स्थितीत बदल झाला असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील शासकीय तथा अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षकीय तथा शिक्षकेत्तर पदांची **दि ३०.०९.२०१५ रोजीची सुधारीत** पदनिहाय मंजूर भरलेली रिक्त पदांची अचूक माहिती संचालनालयास प्रथम प्राध्यान्याने सादर करावी म्हणजे पदांच्या आढाव्यासंदर्भात पुढील कार्यवाही करणे शासनास शक्य होईल.

कालमर्यादा : २६/१०
अध्यक्ष ०७/११/१०
१९/१०

५९९६ २६/१०/११

( डॉ सुभाष महाजन )
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : सर्व प्राचार्य / संचालक शासकीय आणि अशासकीय पदवी तथा पदविका संस्था व तत्सम.
त्यांना कळविण्यात येते की, सदरची माहिती संबंधित विभागीय कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावी व त्याची एक प्रत संचालनालयास सादर करावी त्याचप्रमाणे ही माहिती शासनास पदांच्या आढाव्याबाबत सादर करावयाची असल्याने अचूक असणे आवश्यक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

पृ.क्र.विकाअ/आस्था/पदांचा आढावा/२०१५/2702
दिनांक 28 OCT 2015

प्रति,

प्राचार्य,शा.अभि.महा.अमरावती/शा.औ.निर्माणशास्त्र महा.अमरावती
प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन,अमरावती/खामगांव/यवतमाळ/वाशिम/मुर्तिजापुर.
प्राचार्य,शासकीय निवासी महिला तंत्र निकेतन,यवतमाळ
प्राचार्य,डॉ.पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन,अमरावती/गीतादेवी खंडेलवाल ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी अकोला.

त्यांना कळविण्यांत येते की,आपल्या संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची दिनांक ३०.९.२०१५ ची सुधारीत पदनिहाय मंजुर भरलेली व रिक्त पदांची माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी व माहितीची एक प्रत संचालनालयास का.क्र.५(३) ला परस्पर ईमेलव्दारे सादर करावी.

सहसंचालक
तंत्र शिक्षण,अमरावती